सकाळ रविवार today

नागपूर | रविवार, १८ फेब्रुवारी, २०२४ SakalNews SakalMediaNews www.esakal.com

# अशोक वनात बेघरांना मिळणार मायेची ऊब

## ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. भरत वाटवाणी यांच्यात करार

**केवल जीवनतारे :**
सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १७ : जगी ज्याचे कोणी नाही अशा व्यक्ती फुटपाथ, रस्त्यावर, देवळाच्या पायऱ्यावर, वृक्षाच्या, फुटपाथच्या आडोशाला पडून असतात. मिळेल ते खातात, नाहीतर उपाशी. एक दिवस येथेच त्यांचा मृत्यू होतो. पुढे पोलिसांच्या मदतीने रुग्णालयांत मृतदेह नेला जातो व बेवारस म्हणूनच अंत्यविधी होतात. मात्र आता उपराजधानीत बेवारस व्यक्तींना वर्धा मार्गावरील अशोक वन येथे हक्काचा निवारा मिळणार आहे.


डॉ. प्रकाश आमटे


डॉ. भरत वाटवानी

बेवारस, कुष्ठरुग्ण यांना मायेची उब देणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व बेवारस मनोरुग्णांची सेवा करणारे डॉ. भरत वाटवाणी यांच्यात आज अशोक वन येथे याबाबत एक करार होणार आहे. यातून बेवारसांसाठी निवारा उभारणार आहे. विशेष म्हणजे या दोन्ही समाजसेवकांना समाजसेवेसाठी प्रतिष्ठेचा ''मॅगसेसे'' पुरस्कार मिळालेला आहे.

### दर महिन्यात पाच ते सहा बेवारस

दर महिन्यात पाच ते सात निराधार, बेवारस व्यक्तींना पोलिसांमार्फत मेडिकलमध्ये दाखल करण्यात येते. मात्र उपचारातून बरे झाल्यानंतर त्यांना नेण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. अशावेळी मेडिकलच हेच त्यांचे घर बनते. पण बरे झाल्यानंतर वॉर्डात खाट उपलब्ध होत नाही. अशावेळी त्यांच्या राहण्याचा प्रश्न येतो. हा प्रश्न अशोक वनात निवारा तयार झाल्यानंतर सुटणार आहे, असा विश्वास येथील वैद्यकीय सामाजिक अधीक्षकांनी व्यक्त केला.

### बेवारसांसाठी निवारा

उपराजधानीत महापालिका आयुक्त तुकाराम मुंढे असताना शहरातील रस्त्यावर फिरणाऱ्या बेवारस व्यक्तींसाठी निवारा तयार करण्यात आला होता. शहरात १२६२ क्षमता असलेले निवारा केंद्र तयार झाले, मात्र निवारा केंद्र सध्या रिकामे दिसते. जे दिसतात, ते राहात नाहीत. त्यांच्याकडे लक्ष देणारे नसल्याने निघून जातात. त्यावेळच्या नोंदीनुसार शहराच्या विविध भागात बाराशेवर बेवारस व्यक्ती असतील असा अंदाज होता.

" अशोक वन आणि श्रद्धा संस्थेच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या या सेवाभावी उपक्रमाला उपराजधानीतील मानसोपचार तज्ज्ञांकडून मदत केली जाणार आहे. शहरातील मानसोपचार तज्ज्ञ येथील बेवारस व्यक्तींवर उपचारासाठी दर दिवसाला अशोक वन येथे भेट देतील. सायकियाट्रीक असोसिएशनच्या वतीन तसे वेळापत्रक तयार करण्यात येईल. या उपक्रमात सेवा करण्याची संधी मिळणार आहे, हे आमचे भाग्य.

**- डॉ. निखिल पांडे,** मानसोपचार तज्ज्ञ, नागपूर.